महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

स.नं.८३२-ए, सारथी कार्यालयाजवळ, फायनल प्लॉट नं. १७८, १७९, आघारकर संशोधन संस्थेच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४.

Phone No.020 25705000

Maharashtra State
Board of Secondary & Higher
Secondary Education, Pune

S.R.No.832-A, Near Sarthi Office, Final Plot No.178,179,
Behind Agharkar Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411 004.

Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.मं./लेखा -६/परीक्षा शुल्क / 3938
पुणे -४११००४
दि. 22/09/2026

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय:- इ. १० वी व इ. १२ वी मध्ये शिकणाऱ्या एकल महिलांच्या पाल्यांची माहिती घेणेबाबत...
संदर्भ :- शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे क्र.आशिका/२०२६/ए.मा./आस्था -क१४४/
दि. ०४/०९/२०२६ चे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भिय पत्रान्वये राज्यातील एकल महिलांच्या पाल्यांना शिक्षणात प्रोत्साहन मिळण्यासाठी इ. १० वी व इ. १२ वी ची परीक्षा फी माफी /इतर सवलती देण्याबाबत शासन विचाराधीन आहे. त्याकरीता सद्यस्थितीत इ. १० वी व इ. १२ वी मध्ये शिकणाऱ्या मुलांपैकी एकल महिलांचे पाल्यांबाबत माहिती घेणे आवश्यक आहे.

तरी आपल्या कार्यकक्षेतील शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांकडून त्यांचेकडील इ. १० वी व इ. १२ वी मध्ये शिकणाऱ्या मुलांपैकी एकल महिलांचे पाल्यांबाबत विहित नमुन्यात मुख्याध्यापक/प्राचार्य यांचेकडून प्रमाणित माहिती घ्यावी. तसेच, सदर माहितीनुसार आपल्या विभागीय मंडळामध्ये एकूण किती एकल महिलांचे पाल्य आहेत, याची सांख्यिकीय माहिती या कार्यालयास त्वरित सादर करावी.

माहिती तक्ता :

| | | |
|---|---|---|
| १ | शाळा /कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतांक क्र. | |
| २ | विद्यार्थ्यांचे नाव | |
| ३ | इयत्ता (१० वी /इ. १२ वी) | |
| ४ | अनुक्रमांक | |
| ५ | आधार क्र. | |
| ६ | आईचे नाव | |
| ७ | एकल महिला प्रकार | |
| ८ | एकल महिलेचे प्रमाणपत्र /पुरावा आहे काय ? | |
| ९ | कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न | |
| १० | संपर्क भ्रमणध्वनी क्र. | |

Digitally signed by
DIPAK AMBADAS MALI
Date: 22-09-2026
14:09:51

(डॉ. दिपक माळी )
सचिव ,
राज्य मंडळ पुणे-०४.

क्र.कोविमं/माध्य.परीक्षा/3415
दिनांक :- 24 SEP 2026

प्रति,
प्राचार्य / मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा, सांगली, कोल्हापूर.

विषय:- विषय:- इ.10 वी व इ.12 वी मध्ये शिकणाऱ्या एकल महिलांच्या पाल्यांच्या माहितीबाबत.
संदर्भ:- क्र.रा.मं./लेखा-6/परीक्षा शुल्क/3938, दिनांक 22.09.2026

इ.10 वी व इ.12 वी परीक्षेसाठी राज्यातील एकल महिलांच्या पाल्यांना शिक्षणात प्रोत्साहन मिळण्यासाठी परीक्षा फी माफी / इतर सवलती देण्याबाबत इ.10 वी व इ.12 वी मध्ये शिकणाऱ्या मुलांपैकी एकल महिलांचे पाल्यांबाबतची माहिती राज्य मंडळाने दिलेल्या विहीत नमुन्यात उपरोक्त प्रकटनानुसार सर्व सुचनांची नोंद घेऊन त्वरीत सादर करावी.

(गजानन उकिर्डे)
प्र.विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर